# वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, एअरपोर्ट रोड, सिडको, औरंगाबाद

## निविदा सूचना

वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाच्या मालकीचे सिडकोचे उपभूखंड क्र.९ व १० च्या विक्रीसाठी इच्छुक निविदाधारकांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

### परिशिष्ट

| मिळकतीचे वर्णन | आकार (मीटर) | क्षेत्रफळ(चौ.मी.) | चतुःसीमा |
|---|---|---|---|
| अलकानगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जाधववाडी, हत्तेसिंगपुरा, सेक्टर ई-३, सिडको, एन-९, औरंगाबाद येथील उपभूखंड क्र.९ व १० (सिडको, एन-९,मनपा शाळेच्या उत्तरेस) | ३४.६८२ x १४.७५६ | ५११.७६ | पूर्वेस - ९.० मीटरचा रुंद रस्ता<br>पश्चिमेस - ९.० मीटरचा रुंद रस्ता<br>दक्षिणेस - १५.० मीटरचा रुंदरस्ता<br>उत्तरेस - प्लॉट नं.८ व ११ |

इच्छुक निविदाधारकांनी निविदा वसंतराव नाईक महाविद्यालय परिसरातील वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, एअर पोर्ट रोड, सिडको, औरंगाबाद कार्यालयातून निविदा शुल्क रु.१५००/- भरुन खरेदी करावी.

सूचना प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांत निविदा मंडळ कार्यालयात बंद लिफाफ्यात सादर करावी. सदर निविदा कार्यकारीणी मंडळासमक्ष निविदा बोली उघडण्याची तारीख आपणास कळविण्यात येईल.

**निविदा सुचनेतील अटी-शर्ती आम्हास मान्य असल्याच्या पुष्टयर्थ अटी शर्ती खालील प्रमाणे पुनरुच्चार करीत आहोत.**

१.उक्त मिळकतींची किमान विक्री मूल्य रुपये ३०,१००/-प्रति चौ.मीटर याच्यापेक्षा कमी विक्री मूल्य स्वीकारण्यात येणार नाही.

२.विक्री मिळकती विषयी सर्व ती वैधानिक माहिती, सदर निविदा भरणाऱ्याने आगाऊ समजून घेतली आहे, विक्री मिळकत बिनजोखमीची व विधिग्राहय पध्दतीने हस्तांतरणीय होऊ शकेल अशी आहे.ही खात्री करुन घेतली आहे व नंतरच निविदा भरली आहे, असे गृहीत धरण्यात येईल. निविदा सूचना भरल्यानंतर विक्री मिळकतीच्या मालकी हक्क व बोजे याविषयी कोणतीही तक्रार निविदाधारकास करता येणार नाही.

३.निविदाधारकास अनुक्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या दराप्रमाणे एकूण विक्रीमूल्याच्या ३० टक्के रुपये एवढी अनामत जमा करावी लागेल. सदर रक्कम बिन व्याजी सुरक्षा अनामत आहे. ही रक्कम निविदाधारकास व्यवहार पूर्ण करण्यास उत्सुक व सक्षम आहे अशी हमी देण्यासाठी फक्त आहे. अनामत रक्कम स्वीकारल्याने संस्था व निविदा धारकांच्या मध्ये विक्री मिळकती विषयी कोणताही विधी ग्राहय संबंध तयार झाला आहे असे समजण्यात येणार नाही.

४.प्रस्तुत निविदा प्रक्रियेद्वारे प्रस्तावित असलेले भूखंड विक्री ही महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ३६ अन्वये परवानगीच्या आधीन असेल.

५.ज्या निविदा धारकाची निविदा सर्वोत्तम किंमत देत असेल त्या निविदा धारकास पात्र निविदा धारक म्हणून घोषित करण्यात येईल.

६.पात्र निविदा धारकास कायदयाच्या कलम ३६ अन्वये आवश्यक परवानगीच्या कारवाईमध्ये संस्थेचे सर्वतोपरी आवश्यक ती मदत करावी लागेल. परंतु उक्त कारवाईत लागणारा खर्च संस्था सोसेल.

७.कलम ३६ च्या तरतुदीप्रमाणे अनुज्ञेय परवानगी मिळाल्यानंतर व त्या परवानगीतील अटी-शर्तींना अधीन राहून ज्या निविदा धारकाची निविदा स्वीकृत झाली आहे त्यास ठरलेली विक्री किंमत ४५ दिवसांमध्ये भरावी लागेल.

८.उक्त प्रमाणे विक्री किंमत भरल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसात अथवा कलम ३६ प्रमाणे खालील परवानगीमध्ये प्रस्तावीत असेल तितक्या कालावधीमध्ये रीतसर नोंदणीकृत दस्त करुन देण्यात येईल. परंतु, प्रस्तुत कलमात काहीही लिहिलेले असले तरी सदर कलमाचे विवक्षित अनुपालन हे सिडको परवानगी व हस्तांतरण ना हरकत यास अधीन असेल.

९.विक्री मिळकत ही सिडको भूखंड असल्याने, सिडको, औरंगाबाद यांच्या नियमांप्रमाणे आवश्यक त्या सर्व अटी शर्तींची पूर्तता करण्याची व त्यासाठी लागणारा सर्व खर्च करण्याची जबाबदारी पात्र निविदाधारकाची असेल.

१०.मुदतीत विक्री रक्कम भरणा न केल्यास मुदत संपली त्या तारखेच्या दुसऱ्या दिवशीच्या मध्यापासून निविदा प्रक्रिया रद्द होऊन जप्त झाली असे गृहीत धरण्यात येईल व त्यासाठी कुठल्याही अतिरिक्त कार्यवाही वा पत्रव्यवहाराची आवश्यकत असणार नाही.

११.कलम ३६ प्रक्रिया कार्यवाही दरम्यान आवश्यकता भासेल त्या प्रमाणे वा अन्य वैधानीक पुर्तता करण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त अटी व शर्ती टाकण्याचा अधिकार मंडळानी राखून ठेवला आहे व प्रत्येक निविदा धारक मंडळाच्या या अधिकारास अभिव्यक्त संमती देत आहे/आहोत.

१२.सदर निविदा सूचना रद्द करण्याचा वा कोणत्याही निविदाधारकाचे निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंडळाने राखून ठेवला आहे.

१३.प्रस्तुत निविदा सूचनेचे परिशिष्टामध्ये मिळकतीचे वर्णन करण्यात आली आहे जे की मिळकत निशानदेहीसाठी पर्याप्त आहे.

**संपर्कासाठी पत्ता**

**सचिव वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, (वसंतराव नाईक महाविद्यालय परिसर), एअरपोर्ट रोड, सिडको, औरंगाबाद,**